# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

**(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०**

**http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/२३२२

दिनांक :- 20 JUN 2017

प्रति,

**प्राचार्य,**

खाजगी कायम विनाअनुदानित

पदविका/पदवी व पदव्युततर पदवी

अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- खाजगी व कायम विनाअनुदातिन शिक्षण संस्थातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरू ठेवण्याबाबत..**

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/ईबीसी/मुल्यां.व दर्जा माना/२०१७-१८/७७ दिनांक ०५/०६/२०१७

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरू ठेवण्याबाबत शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग,टीईएम-२०१५/प्र.क्र.२०१९/तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१६ व शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दिनांक ३०/०५/२०१७ नुसार मान्यता दिली आहे. सदर शासन निणर्यातील अट क्र.१८ मधील काही मुद्यांची संस्थेने पुर्तता करणे आवश्यक असल्याचे संदर्भिय पत्रात नमुद केले आहे.

सदर योजनेतंर्गत पात्र असणा-या व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या संबंधित शैक्षणीक संस्थांनी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करणे (Assesment Accreditation) आवश्यक असल्याचे नमुद केले आहे.तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखर संस्थांकडून मुल्यांकन व दर्जा निश्चिती करून मुल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणा-या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकरीताच सदर योजना लागू राहिल.

**या पत्रान्वये आपणास सुचित करण्यात येते की, वरील अटीनुसार सर्व संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सक्षम शिखर संस्थांकडून मुल्यांकन व दर्जाचे मानांकन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत प्राप्त करून घेणे गरजेचे आहे. अन्यथा अशा संस्था शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून उपरोक्त शिक्षण शुल्क योजने पासून वंचित राहतील याची संबंधीत संस्था प्रमुख यांनी नोंद घ्यावी.**

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत :- १. **मा.संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

Institute Later 2017-18